Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY


UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Vol (II)

12 January 2019 Special Issue – 68

# महिला सबलीकरणाच्या समस्या & आव्हाने आणि उपाय



Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Executive Editor of This Issue
Prof. A.R. Bhosle
Assist. Prof. Head of Dept. Sociology
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

Dr. S.K. Gaike
Assist. Prof. Dept. of Sociology
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN PUBLICATION

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | January 2019 | UGC Approved No. 40705
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue -92 , महिला सबलीकरणच्या समस्या : आव्हाने आणि उपाय


| | | | |
|---|---|---|---|
| 39. | जागतिकिकरण आणि महिलांचे सबलीकरण | प्रा. विरभद्रेश्वर सामलिंग स्वामी | 108 |
| 40. | कौटुंबिक हिंसाचार कायदा–2005 आणि स्त्रियांपुढील आव्हाने | प्रा.डॉ. अन्सारी एस. जी. | 109 |
| 41. | नारीवादी अध्ययन तथा लेखन की आवश्यकता | डॉ.व्यास सी.पी. | 111 |
| 42. | कळंब तालुक्यातील पारधी जमातीच्या स्त्रिया आणि लिंगभाव विषमता | प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड | 113 |
| 43. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया | डॉ. चांगदेव निवृत्ती मुंढे, | 11 |
| 44. | मराठी स्त्रीवादी साहित्य, समाज आणि स्त्रिया | प्रा.डॉ. रामकिशन दहिफळे | 11 |
| 45. | महिलांमधील रोजगार योजने संदर्भातील जागरूकता आणि | डॉ. अनिता जिवतोडे (टेकाडे) | 12 |
| | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | | |
| 46. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | श्री. बापू तुकाराम बाराते | 1 |
| 47. | साहित्य समाज आणि स्त्रिया | डॉ. जनार्दन काटकर | 1 |
| 48. | कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ आणि स्त्रियांपुढील आव्हान | डॉ. रेखा एम. शेरकर | 1 |
| 49. | परित्यक्ता स्त्रियांचे प्रश्न | प्रा.डॉ.संतोष देशमुख | |
| 50. | भारतीय समाज व्यवस्थेला लागलेली किडः हुंडा प्रथा | प्रा.बोराडे तानाजी रामभाऊ | |
| | कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005 आणि स्त्रियांपुढील आव्हाने –एक समजाशास्त्रीय अभ्यास | डॉ. गायके एस.के., कांबळे एम.एस. | |
| 1. | कौटुंबीक हिंसाचार व स्त्रिया | कांबळे दलित सुभाषराव | |
| 2. | कौटुंबिक हिंसाचार कायदा–2005 आणि आव्हाणे | डॉ. रामचंद्र मुंजाजी भिसे | |
| 3. | मध्यम वर्गीय स्त्रियांपुढील आव्हाने | प्रा. कोल्हे टी. टी. | |
| 4. | महिला चळवळ आणि स्त्रिया | प्रा.डॉ. विजय दि. पोकळे | |
| 5. | महिला चळवळ आणि स्त्रिया | डॉ. यादव घोडके | |
| | मैत्रेयी पुष्पा के साहित्य में स्त्री और समाज | प्रा.श्रीमती पोटफुले हिरा | |
| | भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रिया आणि हुंडा प्रथा | भिमराव मोटे | |
| | भारतीय महिलांसमोरील समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. परळकर शशिकांत दत्तोपंत | |
| | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा.डॉ. आचार्य आर. डी. | |
| | महिला चळवळ आणि समाजसुधारकांचे योगदान | प्रा.डॉ. मोटे गितांजली सदाशिवराव | |
| | स्त्रीवादी अभ्यास, विकास आणि स्त्रीया | प्रा. गोदावरी डी. बन | |
| | भारतीय स्त्रि.विषयक कायद्याची वास्तविकता.विश्लेषत्मक अध्ययन | प्रा.सिताराम कचरु मोगल | |
| | वैश्विक लैंगिक अंतराल में भारत की स्थिति का अध्ययन | प्रा. छाया एस. तोटवाड, | |
| | | प्रा. डॉ. सुर्यकांत टि. पवार | |
| | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा.सोनटक्के रमेश शंकरराव | |
| | लिगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा. सुलभा बब्रुवान सोळंके | |
| | स्त्री विरोधी हिंसा- कारणे व उपाय | प्रा.डॉ.बी.एन.कावळे | |
| | लिंगभाव असमानता आणि बांधकाम क्षेत्रातील स्त्रियांच्या समस्या | प्रा. भोसले एस. | |

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN-2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452, (GIF) - 0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue -92 , महिला सबलीकरणाच्या समस्या : आव्हाने आणि उपाय

# लिंगभाव विषमता आणि स्त्रिया

श्री. बापू तुकाराम बाराते
संशोधन विद्यार्थी

---

**प्रस्तावना :—**

भारतीय समाजामध्ये विविध प्रकारचे प्रश्न आणि समस्या आहेत. त्यामध्ये स्त्री विषयक समस्या ही आव्हानात्मक बाब आहे. भारताची संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे, त्यामुळे देखील स्त्रियांच्या समस्यांमध्ये भर पडत आहे. जागतिक पातळीवर अभ्यास केला तर विकसित राष्ट्रांत स्त्रियांच्या समस्या अल्प प्रमाणात आहेत. विकसनशील राष्ट्रांमध्ये स्त्रियांचे प्रश्न व समस्या वेगळ्या आहेत. भारतामध्ये स्त्रियांचे जे विविध प्रश्न आणि समस्या आहेत, त्यांमध्ये लिंगभाव विषमता हा घटक प्रभावीपणे जाणवतो, एवढेच नव्हे तर भारतातील लिंगभाव विषमता नष्ट करणे, हे राष्ट्रापुढील एक आव्हान आहे.

इ. स. १९७२ मध्ये प्रकाशित झालेल्या 'ैमग ळमदकमत दक ैवबपमजल' या ग्रंथात ॲन ओकले या विचारवंताने सर्वात प्रथम 'जेंडर' हा शब्द वापरला. जेंडर म्हणजे लिंगभाव होय. लिंगभाव ही एक अशी संकल्पना आहे की जी जैविक भेदापेक्षा कांहीशी वेगळी आहे. प्रत्यक्षात स्त्री—पुरुषांमधील जैविक भिन्नत्व दर्शविण्यासाठी 'सेक्स' या संकल्पनेचा वापर केला जातो. तर 'जेंडर' अर्थात् लिंगभाव ही संकल्पना समाजाद्वारे स्त्री—पुरुषांमध्ये निर्माण केलेल्या सामाजिक भिन्नत्वाशी संबंधित आहे. जन्म घेतलेले प्रत्येक अर्भक सुरुवातीला एक जैविक प्राणी असते, पण सामाजिकीकरणाच्या माध्यमातून त्याच्यावर वेगवेगळे संस्कार करुन त्या हाडा—मांसाच्या जीवाला स्त्री किंवा पुरुषामध्ये सामाजिक दृष्ट्या परिवर्तित केले जाते. अर्थात् जेंडर ही संकल्पना स्त्री किंवा पुरुषत्व यांच्या समांतर आणि सामाजिक स्वरूपावर आधारित असलेल्या असमान विभाजनाशी संबंधित आहे. केवळ लिंग हा घटक जबाबदार मानून स्त्री आणि पुरुष यांमध्ये विविध बाबतीत केलेली विषम स्वरूपाची विभागणी म्हणजे लिंगभाव विषमता होय. स्त्री म्हणून किंवा पुरुष म्हणून जन्मास येणे, हे कोणाच्याही हातात नसते. हे माहित असताना देखील लिंगभेदामुळे स्त्रियांना दुय्यम स्वरूपाची वागणूक देणे, हेटाळणी करणे म्हणजे लिंगविषमता होय. रामायण आणि महाभारतात देखील स्त्रियांची अवमानना झाली. रामायणात रामाने सीतेचा त्याग केला होता, तर महाभारतात पांडवांनी द्रौपदीला जुगारावर लावले होते.

**उद्दिष्टे :—**

१) लिंगभाव विषमतेच्या कारणांचा शोध घेणे.
२) स्त्री—विषयक असमानतेला लिंगभाव कसा जबाबदार आहे, याचा शोध घेणे.
३) स्त्रियांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :—**

लिंगभाव विषमता आणि स्त्रिया, या प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. त्यामध्ये विविध पुस्तके व संदर्भग्रंथ यांचा समावेश आहे. विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**गृहितके :—**

१) स्त्रियांच्या समस्यांना लिंगभाव विषमता जबाबदार आहे.
२) लिंगभाव विषमतेमुळे स्त्रियांच्या समस्यांमध्ये वाढ होत आहे.
३) लिंगभाव विषमता ही जागतिक समस्या आहे.
४) स्त्रियांच्या शिक्षणामुळे लिंगभाव विषमता कमी होत आहे.

**विषय विश्लेषण :—**

ग्रामीण समुदायामध्ये स्त्रियांचे स्थान दुय्यम आहे. तर नागरी समुदायामध्ये सुद्धा स्त्रियांची स्थिती फारशी चांगली नाही. या करिता लिंगभाव विषमता जबाबदार आहे. सामाजिकीकरणाच्या माध्यमातून जे संस्कार केले जातात, ते देखील पुरुषांकरीता वेगळे आणि स्त्रियांकरिता वेगळे आहेत. व्यक्तीचे वर्तन विषयक नियम आहेत, त्यांमध्ये देखील लिंगभाव विषमता जाणवते. या विषम वर्तन नियमांचे समर्थन समाज व्यवस्था करते. परिणामी मुला—मुलींमध्ये लिंगभेदीकरण प्रक्रिया सुरु होते. कुटुंबातील वडिलधारी व्यक्ती संस्कारांच्या माध्यमातून कांही सवयी, ज्ञान, शिस्त यांचे जे धडे देतात, त्यामध्ये देखील लिंगभाव विषमता निदर्शनास येते. भारतामध्ये मूल्य आणि नियमांच्या आधारे लिंगभाव विषमता जाणवते. घरातील

स्त्री रात्री उशीरा घरी आलेली चालत नाही. मात्र पुरुष केंव्हा ही घरी येऊ शकतो. कोणत्याही स्त्रीशी सहजपणे बोलू शकतो किंवा मैत्री करू शकतो. या संदर्भात प्रश्न विचारले जातात. पण त्याची विचारण्याची पद्धती वेगवेगळी असते. आई देखील मुलांची पाठराखण करते. पण मुलीला मात्र सर्वच जण प्रश्न विचारतात. अधिकाराने मोठे असलेल्या आणि लहान असलेल्यांचा ही त्यात समावेश असतो. आपल्या समाजात लिंगभाव विषमतेमुळे पूर्वी स्त्री–पुरुष भूमिका निर्धारण वेगवेगळे केले जात होते. स्त्रियांच्या वाटयाला कौटुंबिक जबाबदाऱ्यांची कार्य दिले जात होते. तर पुरुषांना अर्थार्जनाचे कार्य दिले जात होते.

शालेय पाठ्यपुस्तकात रेखाटलेली चित्रे देखील नकळतपणे लिंगभाव विषमतेचा संस्कार बालमनावर करतात. आपल्या संस्कृतीमध्ये ज्या विविध शिव्या दिल्या जातात, त्या सर्व स्त्रियांच्या लिंगावर आधारित आहेत. ही बाब सुद्धा लिंगभाव विषमता दर्शविते. कुटुंबातील सदस्य, नातेवाईक मुलांकरीता खेळणी खरेदी करित असताना मुलांसाठी वेगळी व मुलींसाठी वेगळी खरेदी करतात. एखादा मुलगा कांही गोष्टींचा हट्ट करून रडत असेल तर 'मुली सारखा काय रडतोस?' असे म्हटले जाते. विविध मराठी चित्रपटांत स्त्रिया विवश, हताश, अन्याय–अत्याचार सहन करणाऱ्या दाखविल्या जातात. एकीकडे देवी, जननी, अर्द्धांगिनी अशा उपमा दिल्या जातात आणि दुसरीकडे त्यांना टोचून बोलणे, मारहाण करणे, हुंड्यसाठी त्रास देणे, बलात्कार करणे, महत्वपूर्ण निर्णयात सहभागी करून न घेणे, अपमानास्पद वागणूक देणे, हे सर्व लिंगभाव विषमतेचे परिणाम आहेत.

लिंगभाव विषमता कमी करण्यासाठी २००१ हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष म्हणून साजरे केले तर ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. कन्या भ्रूणहत्या या संदर्भात बाळाला जन्म द्यायचा की, नाही हा अधिकार मुंबई उच्च न्यायालयाने १९ सप्टेंबर २०१६ रोजी स्त्रियांनाच दिला आहे. तर ८ नोव्हेंबर २०१६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने गर्भपात कायद्याची अंमलबजावणी सक्तीने केली. २६ मे २०१६ रोजी बलात्कारपीडितांच्या पुनर्वसनासाठी राष्ट्रीय धोरणाची आखणी केली. तरी देखील भ्रूणहत्या, बलात्कार यासारखे लिंगभाव विषमतेतून निर्माण झालेले स्त्रियांचे प्रश्न संपलेले नाहीत. कायद्याने परिवर्तन करण्याचे निश्चित केले तरी लोकांच्या मनातून लिंगभाव विषमता नष्ट झाली नाही हे वास्तव आहे.

**निष्कर्ष :–**

१) संपूर्णपणे लिंगभाव विषमता नष्ट झालेली नाही.
२) स्त्रियांच्या विविध समस्यांसाठी लिंगभाव विषमता हा घटक कारणीभूत आहे.
३) कुटुंबातील सामाजिकीकरणात त्रुटी आहेत.
४) स्त्री–शिक्षणामुळे व शासनाच्या धोरण्यामुळे लिंगभाव विषमता कमी होण्यास मदत होत आहे.
५) स्त्रिया अर्थार्जर्न करू लागल्यामुळे त्यांच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात सकारात्मक बदल होत आहे.

**शिफारसी :–**

१) स्त्री विषयक कायद्यांची कठोर अंमलबजावणी करावी.
२) पालकांनी मुलाप्रमाणेच मुलीच्या जन्माचे स्वागत करावे.
३) वंशाचा दिवा मुलगा न मानता मुलगी ही दोन्हीं घरची प्रकाशज्योत आहे हे मान्य करावे.
४) पालकांनी मुलीकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पहावे.
५) स्त्रियांच्या उच्चशिक्षणाचे प्रमाण वाढवावे.

**संदर्भ सूची :–**

१) भारतीय सामाजिक समस्या – डॉ. सुधा काळदाते
२) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या – डॉ. दा. धो. काचोळे
३) समाजशास्त्र – डॉ. जी. एच. शर्मा
४) सामाजिक समस्या – डॉ. रा. ल. लोटे
५) भारत २०१७ – विश्लेषण व माहिती संग्रह – सं. तुकाराम जाधव

ISSN [illegible]
Impact Factor [illegible]

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL
Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

## SPECIAL ISSUE No. 51

**Executive Editor**
**Dr. Jaisingrao Deshmukh**
Principal
Ramkrishna Paramhansa Mahavidyalaya,
Osmanabad. (M. S.)

**Co-Editor**

**Mr. D. M. Shinde**
Asso. Prof. & Head, Dept. of Sociology

**Mr. M. U. Ugile**
Asst. Prof. Dept. of Sociology

**Chief Editor**
**Prof. Pramod Tandale**

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | डॉ. विठ्ठल मारुती कांबळे | बालकामगार समस्येची कारणे आणि परिणाम | 58 |
| 23 | प्रा.डॉ.पांडुरंग मुरूटे | भारतातील बालकामगाराची स्थिती : कारणे व उपाय यांचा समाजशास्त्रीय अभ्यास | 60 |
| 24 | प्रा. डॉ. भगवान भानुदास आव्हाड | भारतातील बालकामगार समस्येची कारणे आणि परिणाम | 62 |
| 25 | प्रा. डॉ. विजय दिनकर पोकळे | भारतातील आधुनिक बालकामगार समस्येचे स्वरूप | 65 |
| 26 | श्री. डी. एम. शिंदे | भारतातील बालकामगार समस्येची कारणे व परिणाम | 67 |
| 27 | प्रा. रमेश शंकरराव सोनटक्के | बालकामगार समस्येची कारणे आणि परिणाम | 70 |
| 28 | प्रा. सौ. संगिता यशवंत पाटील | भारतातील बालकामगार समस्या निर्मूलनासाठी कायदेशीर उपाय योजना | 73 |
| 29 | प्रा. विरभद्रेश्वर सामलिंग स्वामी | भारतातील बालकामगार समस्येची कारणे व परिणाम | 76 |
| 30 | प्रा. बालाजी पीडगे | बालकामगारांचे पुनर्वसन व शासनाची भुमिका | 79 |
| 31 | प्रा. बी.जे. कुकडे | बालकामगार समस्येची कारणे व परिणाम | 82 |
| 32 | श्री. देवदत्त त्र्यंबक खजूरकर | बालकामगार भारतीय समाजास लागलेला एक कलंक | 85 |
| 33 | प्रा. टी. आर. वोराडे | बालकामगार एक सामाजिक समस्या | 88 |
| 34 | प्रा.सौ.माधुरी गोविंद गिरी | भारतातील बालकामगार समस्या निर्मूलनासाठी कायदेशीर उपाय योजना | 90 |
| 35 | श्री. देवदत्त त्र्यंबक खजूरकर | बालकामगार- समस्येचे परिणाम व शिक्षण | 92 |
| 36 | चेतन मोहन गायकवाड | भारतातील बालकामगार समस्या निर्मुलनासाठी कायदेशीर उपाययोजना | 94 |
| 37 | श्री. बापू तुकाराम वाराते | बालकामगार समस्येची कारणे व परिणाम | 96 |
| 38 | प्रा. जे. एन. शितोळे | भारतातील बालकामगार समस्या निर्मूलनासाठी कायदेशीर उपाययोजना | 99 |
| 39 | प्रा.सुलभा बब्रुवान सोळंके | भारतातील बालकामगार समस्या निर्मूलनासाठी कायदेशीर उपाययोजना | 102 |
| 40 | भिमराव दत्तु मोटे | बालकामगार: एक गंभीर सामाजिक समस्या | 105 |
| 41 | प्रा. माधव उत्तमराव उगीले | भारतातील बालकामगार समस्या निर्मूलनासाठी कायदेशीर उपाययोजना | 108 |
| 42 | डॉ. राजेंद्र बगाटे | बालकामगार – एक सामाजिक समस्या | 111 |

# बालकामगार समस्येची कारणे व परिणाम

श्री. बापू तुकाराम वाघे
(समाजशास्त्र विभाग)

**प्रस्तावना :-**

बालकामगारांची समस्या प्राचीन व विश्वव्यापी आहे. बालकामगारांची समस्या प्रत्येक देशात कोणत्याना कोणत्या स्वरुपात राहिली आहे. १८ व्या शतकात इंग्लड मधील सूत गिरणीमध्ये कामकणाऱ्या मुलांची अवस्था दैनिय होती.

भारतात बालमजूरी ही प्रथा प्राचीन आहे. याची सुरुवात गुलामगिरीच्या काळापासून झाली आहे. कृषी तथा इतर कामासाठी बालमजूरांचा उपयोग केला जातो. अनेक उपयाद्वारे विभिन्न उद्योगातील बाल मजूरांची संख्या कमी झाली असली तरी बालमजूरांची संख्या मात्र कमी झाली नाही. बालकामगार समस्येकडे सामाजिक विचारवंत कार्यकर्ते राजकीय पक्ष शासन इतकेच नव्हे तर सामान्य जनतेचे ही लक्ष कमी झाले आहे. दिल्ली विधान सभेच्या १९९८ च्या निवडणुकी प्रसंगी दिल्लीतील बालकामगार संघटनेच्या वतीने निवडणूकीसाठी उभारलेल्या सर्व उमेद्वारांना बालकामगारांचे उच्चाटन करण्याची शपथ घेण्या विषयी एक निवेदन पाठविण्यात आले होते. पण कोणत्याही उमेद्वाराने किंवा राजकीय पक्षाणे निवडणुक प्रचारवेळी किंवा नंतर देखिल य्रा शब्द उच्चारला नाही. आशा विविध कारणामुळे बालकामगार ही समस्या तिव्रस्वरुप धारण करित आहे.

**उद्दिष्टये :-**

१) बालकामगार समस्येचे स्वरुप अभ्यासणे.
२) बालकामगार समस्येच्या कारणांचा शोध घेणे.
३) बालकामगार समस्येच्या परिणामाचा अभ्यास करणे.
४) बाल कामगार समस्येची दाहकता समजूण घेणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधन शोध निबंधासाठी अन्वेषनात्मक पद्धतीचा व प्राथमिक आणि दुय्यम तथ्यांच्या अवलंब केला आहे.

**गृहितके :-**

१) दारिद्र्यामुळे बालकामगार समस्या निर्माण होत आहे.
२) बालकामगार समस्येचा बालकाच्या शारिक वाढीवर परिणाम होत आहे.
३) कृषी क्षेत्रात ग्रामीण भागात आधिक बाल कामगार आहेत.
४) या समस्येचे पूर्णपणे निर्मुलन करण्यात शासन अपयशी ठरत आहे.

**विषय विश्लेषण :-**

बालकामगार हो जागतिक स्वरुपाची सामाजिक समस्या आहे. १६ व्या ते १८ व्या शतकात इंग्लड, अमेरिका या देशात बालमजूरांची संख्या वाढली. १९१९ मध्ये आयलो या राष्ट्राला बालकामगार या समस्येची जाणिव झाली. २००२ पासून आयलो येथे १२ जून हा जागतिक बालकामगार दिन साजरा करण्यात आला.

आपल्या देशात सर्वात जास्त उत्तर प्रदेश या राज्यात बालकामगारांची संख्या अधिक आहे. महाराष्ट्र या राज्याचा अभ्यास केला तर २०११ च्या जनगणनेनुसार ७ लाख बालकामगार आहेत. महाराष्ट्राचा सर्वाधिक बालकामगार असणाऱ्या राज्यामध्ये चौथा क्रमांक आहे. केवळ मुंबई या शहरांचा विचार केला तर ५५ हजार बालकामगारांची नोंद आहे.

परंतु वास्तविक आकडेवारी या पेक्षा दुप्पट आहे. १२ जून २०१८ रोजी शिवनेरी न्युजने महाराष्ट्रात २५ लाख बालकामगार आहेत हे वृत्त प्रसारित केले होते. मुंबई मध्ये असणाऱ्या बालकामगारामध्ये ६० ते ७०% प्रमाण हे बिहार, उत्तरप्रदेश या राज्यातील आहे. घरकाम करणाऱ्या बालकामगारामध्ये मुलींचे प्रमाण ९०% आहे तर १०% मुले कार्य करतात.

**बालकामगाराची व्याख्या :-**

१) होमरफोक :-

बालकामगार म्हणजे मुलांनी केलेले असे कोणतेही कार्य की ज्यामुळे त्यांच्या शारीरिक विकासामध्ये किमान शैक्षणिक पातळी गाठण्याच्या संधी मध्ये किंवा आवश्यक मनोरंजनामध्ये बाधा उत्पन्न होते.

२) दि कमिटी ऑन चाईल्ड लेबर :-

बाल लोकसंख्येतील असा भाग की जो सवेतन किंवा विनवेतन कामकरतो त्याला बालकामगार म्हणतात.

३) १९८६ कायदा :-

सर्वसाधारण पणे १४ वर्ष वयोगटाआतील बालकानी केले कार्य म्हणजे बाल कामगार होय.

आपल्या देशात शेती मशागत, शेतमजूरी पशुपालन, मासेमारी, शिकार उत्पादन प्रक्रिया सेवा घरकाम, बांधकाम, व्यापार, वाहतूक हॉटेल, कच्चा किंवा भंगार गोळा करणे, विट्ट काम इत्यादी क्षेत्रात बाल कामगारांची समस्या दिसून येते. असे असलेतरी

आपल्या देशात असणाऱ्या एकुण बालकामगारामध्ये ५०% प्रमाण कृषी क्षेत्राशी संबंधित बालकामगारांचे आहे. याची विविध कारणे आहेत.

**बालकामगार समस्येची कारणे :-**

१) दारिद्रय :-

भारतात दारिद्रयाचे प्रमाण आज देखील २८% आहे. परंतु हे दारिद्रयाचे निकष्क फार जुने आहेत की अकडेवारी अधिक आहे. दारिद्रय मध्ये जीवन जगणारी कुंटुंबे आपल्या अपत्यानां लहान पणे काम करण्यास भाग पडतात.

२) जातीव्यवस्था :-

भारतातील जातीव्यवस्था पूर्णपणे नष्ट झालेली नाही. स्पृश्य अस्पृश्य यामुळे सामाजिक विषमता निर्माण झाली व कनिष्ठ जातीची उपासमार झाली व त्यांच्या अपत्यांना वरिष्ठांच्या घरची कामे करावी लागली.

३) कामगाराना मिळणारे वेतन :-

कामगार कायदे अस्तीत्वात असून देखिल कमी मजूरी दिली जाते. किमान वेतन कायद्याची अमंलबजावणी होत नाही परिणाम लहान बालकांना बालमजूरी करावी लागते.

उदा :- आजही ग्रामीण भागात महिलांना १५० रुपये तर पुरुषांना ३०० रुपये मजूरी दिले जाते.

४) बेकारीचे प्रमाण :-

आपल्या देशात सापेक्ष व निरपेक्ष दारिद्रय व विविध प्रकारची बेकारी आहे. काम करण्याची इच्छा असताना काम उपलब्ध होत नाही व काम मिळले तर सर्व कुटूंब शेती व्यवसायात अपत्यसह मजूरी करतात.

५) पित्याचे निम्न शिक्षण :-

पित्याचे शिक्षण उच्च असेल तर शिक्षण प्राप्त करण्याच्या आकांक्षा मुलांच्या मनात रुजवतात परंतु कमी शिक्षणामुळे अपत्याना कामाला लावतात.

६) कुंटुंबाचा मोठा आकार :-

ज्या कुटूंबाचा मोठा आकार असतो तेथे कमावते कमी व खाणारे अधिक होतात परिणाम लहान मुलानाही कामरावे लागते.

७) व्यवसनाधिनता :-

अनेक कुटूंबात व्यवसनाधिनतेचे प्रमाण वाढत आहे. असे पालक मुलांच्या शिक्षणापेक्षा पैसा व्यवसनामध्ये घालवतात व आपल्या अपत्यांना दुसऱ्याकडे कामाला ठेवतात.

८) झोपडपट्टी :-

भारतात झोपडपट्टी ज्या परिसरात आहे तेथे या लोकांना आपली उपजीविका करण्यासाठी संघर्ष करावा लागतो व या कुंटूंबातील मुले बंगार गोळा करतात. हॉटेल दुकानात कामे करतात.

९) पालकांचा निष्काळजी पणा :-

पालक देखिल या समस्येसाठी जबाबदार आहेत. कमीत कमी अपत्यांना जन्म देऊन त्यांचे योग्य ते पालन पोषण केले पाहिजे परंतू असे होत नाही.

१०) शासनाचे दुर्लक्ष :-

शासन देखिल या समस्येकडे दुर्लक्ष करत आहे, कायद्यातील तरतुदींचा भंगकरणाऱ्या संबंधीत व्यक्तीवर कठोर कार्यवाही केली पाहिजे करत नाही. या शिवाय शिक्षणाची जिवळ व्यवस्था नसणे भोगवादी संस्कृतीचा मुलावर पडलेला प्रभाव ही देखिल करणे आहेत.

**बालकामगार समस्येचे परिणाम :-**

१) कुपोषण :-अर्थिक अभाव व कठोर परिमाणामुळे कुपोषणाची शिकार बनतात. गरीबीमुळे मेहनत करुन सुध्दा योग्य पौष्टीक अहार मिळत नाही.

२) रोगग्रस्त पिढी :-कडक ऊन, थंडी, पाऊस अशा परिस्थीतीत अनेक रोगाची शिकार होतात. धूळ, धूर, गोगांट यामूळे बालकामगारांना डोळे फुप्फुसाची त्वचेचे रोग जडतात.

३) शारिरीक अवयव गमावणे :-उद्योगात होणाऱ्या दुर्घटनामुळे बालकामिकांना आपले अवयव गमावावे लागतात.

४) अमानवी वागणूक :-बालकामगारांना सन्मानाची वागवणक दिली जात नाही

५) कमी मोबदल्यात जास्तीत जास्त श्रम करुन घेतले जाते.

६) बालकामगारांना काम दिल्यामुळे मालक वर्ग अधिक वेतन प्रौढ कामगारांना दयावे लागते म्हणून प्रौढाव्य रोजगार देत नाही परिणाम प्रौढ बेकारीत वाढ होते.

७) बालकाचा शारिरीक, मानसिक, शैक्षणिक विकास खुटंतो.

८) बालकामगाराच्या संख्येत वाढ झालीतर राष्ट्राची प्रतिष्ठा ढागाळतो.

९) बालमजूरी मुळे २०% उत्पादनात त्याच्या एकुण घट होते.

१०) मुलाच्या मनात न्यनंगड निर्माण होतो व आत्मविश्वास कमी होतो.

Special Issue August 2019

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
आणि
भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे

## खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई

यांच्या संयुक्त विद्यमाने समाजशास्त्र विषया अंतर्गत
राष्ट्रीय चर्चासत्र

# वृद्धांच्या समस्या कारणे आणि उपाय





संपादक
डॉ.बाळासाहेब मुंडे

# Index

01) वृध्दांच्या कौटुंबिक समस्या
प्रा.डॉ. मोटे गितांजली सदाशिवराव, जि.बीड ||18

02) वृध्दांच्या समस्येवरील उपाय
प्रा. गंगाधर चव्हाण, मिरज ||20

03) ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या शासकीय योजना
प्रा. विनायक यशवंत वनमोरे, मिरज ||22

04) वृद्धांच्या विविध समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास
प्रा.डॉ. यादव घोडके, जि. बीड ||24

05) ज्येष्ठ नागरिक संघ : एक दृष्टीक्षेप
प्रा. डॉ. रविंद्र दगडू वाघ, धुळे, शितल ज्ञानेश्वर पाटील, जळगाव ||27

06) वृध्द महिलांच्या समस्या
प्रा.पवार बळीराम वसंतराव, जि.लातूर ||31

07) वृध्दांच्या आरोग्यविषयक समस्या
डॉ. जाधव सत्यभामा विलास , नांदेड ||33

08) भारतीय समाजातील वृध्दांच्या समस्येचे कारणे, परिणाम आणि उपाय
प्रा.डॉ.पडोळे डी.व्ही., जि.उस्मानाबाद ||35

09) वृध्दांच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन
प्रा.डॉ. शशिकांत दत्तोपंत परळकर, जि.बीड ||39

10) भारतातील वृद्धांच्या कौटुंबिक समस्या
श्री. बापू तुकाराम बाराते ||40

11) वृध्दांच्या सकारात्मक आरोग्यासाठी योगासनाची भुमिका
प्रा.बाबासाहेब म्हाळू सरगर, मिरज ||43

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication
August 2019
Special Issue


10

# भारतातील वृद्धांच्या कौटुंबिक समस्या

श्री. बापू तुकाराम बाराते

**प्रस्तावना :—**

भारतीय समाजात आज विविध सामाजिक समस्या दिसून येतात. त्या समजून घेताना समाज जीवनातील कांही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक ठरते. या देशात अनेक धर्म, पंथ, जाती, जमाती आणि संस्कृतीचे लोक राहतात. येथे कोणतीही सामाजिक समस्या दूर करण्यासाठी कायद्याने एक योजना राबविणे नेहमीच कठिण जाते.

वृद्धापकाळ ही एक समस्या बनली आहे. वृद्धापकाळात मुलांनी आपली देखभाल करावी, अशी प्रत्येक वृद्ध माता—पित्यांना आशा असते. पारंपारिक मूल्यांनुसार वृद्ध आई—वडिलांची सेवा करणे हे पुत्रांचे कर्तव्य आहे. परंतू आधुनिक काळात अनेक कुटुंबातील मुले आर्थिक आणि इतर कारणांमुळे वृद्ध आई—वडिलांचा सांभाळ करण्याचे नैतिक कर्तव्य पूर्ण करीत नाहीत.

कोणत्याही प्रकारचे आर्थिक उत्पन्न नसलेल्या वृद्ध आई—वडिलांच्या पालन—पोषणाची जबाबदारी मुलांची आहे, असा निर्णय न्यायालयाने दिलेला आहे. परंतू ज्या कुटुंबात एकच मुलगा व तो ही परदेशात उच्च पदावर कार्यरत आहे, अशा कुटुंबात वृद्ध आई—वडिलांचा सांभाळ कोणी करायचा ही समस्या निर्माण झाली आहे. ज्या कुटुंबात एकापेक्षा अधिक मुले आहेत, त्या कुटुंबातही वृद्ध आई—वडिलांना सांभाळण्याची जबाबदारी सर्व मुले घेतातच असे दिसून येत नाही. कोणत्यातरी एकाच मुलाला ही जबाबदारी पूर्ण करावी लागते, ती देखील केवळ समाजासाठी!

प्रथा व परंपरांच्या दृष्टिने कुटुंबात वृद्ध आई—वडिलांचे स्थान सर्वोच्च होते. परंतू प्रत्यक्षात मात्र वृद्ध आई—वडिलांची स्थिती फारच केविलवाणी झालेली आहे.

**उद्दिष्टये :—**

१. भारतातील वृद्धांच्या समस्यांचा अभ्यास करणे.
२. वृद्धांच्या कौटुंबिक समस्यांचे अध्ययन करणे.
३. कौटुंबिक प्रश्नांची तीव्रता का वाढते ते जाणून घेणे.

**गृहितके :—**

१. भारतातील वृद्धांच्या समस्यांमध्ये वाढ होत आहे.
२. वृद्धांचे कौटुंबिक प्रश्न नव्याने निर्माण होत आहेत.
३. वृद्ध व नातेवाईक यांचेमध्ये समायोजन कमी झाले आहे.
४. वृद्धांच्या समस्यांची तीव्रता कमी करण्यात शासन अपयशी ठरत आहे.

**संशोधन पद्धती :—**

प्रस्तूत संशोधन लेखासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे. या करीता निरीक्षण व दुय्यम स्वरूपाची तथ्ये वापरली आहेत. यासाठी संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे इ. चा आधार घेतला आहे.

**विषय विश्लेषण :—**

प्रत्येक देशाच्या लोकसंख्येत वृद्धांचे प्रमाण बदलत आहे कारण नवीन वैद्यकीय शोध आणि सार्वजनिक आरोग्याच्या सेवा ज्याप्रमाणात वाढ होते, तसेच व्यक्तींचे सरासरी आयुर्मान वाढू लागले आहे. आयुर्मानात वाढ होणे ही देखील वृद्धांच्या संख्येमध्ये व प्रश्नांमध्ये वाढ करते. उदाहरणार्थ भारतात १९५१ मध्ये सरासरी आयुर्मान ३० वर्षे होते, ते आज ६७ वर्षांपर्यंत पोहोंचले आहे.

भारताच्या एकूण लोकसंख्येत वृद्ध लोकांचे प्रमाण पाश्चात्य देशांएवढे नाही. ज्यादेशात वृद्धांचे प्रमाण ७ टक्केंपेक्षा अधिक झाल्यास त्यादेशात वृद्धांच्या समस्या निर्माण होतात. भारतात २०११ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण ८ टक्क्यांपर्यंत पोहोंचले आहे. महाराष्ट्रात तर हे प्रमाण ९.३ टक्के आहे. भारतात असणाऱ्या १२५ कोटी लोकसंख्येमध्ये १० कोटी लोक वृद्ध आहेत.

आपणांस वृद्ध किंवा म्हातारे असे संबोधने अनेक व्यक्तींना आवडत नाही. भारतात वयाच्या ६५

पुढील व्यक्तींना 'वृद्ध' मानले जाते. तर काही व्यक्ती म्हणतात की सेवानिवृत्तीचे जे वय आहे, त्यानंतरचा जो कालखंड आहे, तो म्हणजे वृद्ध अवस्था होय.

**वृद्धावस्थेच्या व्याख्या :–**

१. एलिझाबेथ हरलॉक यांच्या मते "वृद्धावस्था ही मानवी जीवनातील शेवटचे चरण आहे."

२. हेन्री यांच्या मते "जीवनातील उपयोगी व अभिलाषा असणाऱ्या आरंभीच्या अवस्थेपासून दूर जाण्याच्या प्रक्रियेला वृद्धावस्था म्हणतात."

थोडक्यात प्रौढ व्यक्तीच्या जीवनातील अंतिम कालखंड म्हणजे वृद्धावस्था होय.

भारतात आजी–आजोबा–मुले–सुना–नातवंडे अशा तीन पिढ्या एकाच ठिकाणी राहणारे संयुक्त कुटुंब दुर्मिळ झाले आहे.

विवाहानंतर अल्पकाळातच मुलगा व सून स्वतंत्र राहते. भारतीय संयुक्त कुटुंब पद्धतीचे विघटन होणे ही वृद्धांच्या कौटुंबिक आणि सर्व समस्यांना जबाबदार आहे. वृद्ध आई–वडिलांना मुलांपैकी एका मुलाकडे आईला तर दुसऱ्या मुलाकडे वडिलांना विभाजित केले जाते. ज्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली नाही तेथे ही वृद्धांच्या समस्या आहेत. तर ज्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली आहे तेथे देखील वृद्धांचे प्रश्न आहेत. उदाहरणार्थ रेमंड कंपनीचे मालक विजयपत सिंघानिया यांना रस्त्यावर यावे लागणे व न्याय मागणे ही वृद्धापकाळाची मोठी शोकांतिका आहे.

शहरी भागामध्ये वृद्ध माता–पित्यांपेक्षा अधिक काळजी कुत्र्यांची घेतली जाते. कुत्र्यांवर आणि आपल्या शान–शौकतीवर जो खर्च करतात त्यामधील १० टक्के खर्च वृद्ध माता–पित्यांवर केला तर वृद्धांची समस्या भारतात वाढणार नाही.

वृद्ध आणि कौटुंबिक आप्त जन यांनी स्वभावामध्ये परिवर्तन केले पाहिजे. सर्वांचेच स्वभाव हट्टी होत आहेत. हट्टी स्वभावामुळे वृद्धांचे कौटुंबिक प्रश्न निर्माण होत आहेत. प्रौढावस्थेत कांही व्यसने किंवा सवयी असतात. त्या सवयी वृद्धापकाळात बदलल्या पाहिजेत, पण त्या बदलत नाहीत व कौटुंबिक संघर्ष निर्माण होतो व त्यात वृद्धांचे बळी जातात.

पूर्वी वृद्धांना कुटुंबात मानाचे स्थान होते. संयुक्त कुटुंबातील पद्धतीने वृद्ध कुटुंब प्रमुखाची जबाबदारी पेलत होते. कुटुंबातील तरुण व बाल सर्व सदस्यांना आपल्या कुटुंबातील वृद्धांविषयी प्रेम, आदर, आपुलकी, आत्मीयता, सहानुभूती वाटत होती परंतु आज वृद्ध व्यक्ती अडगळी वाटत आहेत.

काळाने व्यक्तींची सहनशीलता कमी केली आहे. प्रत्येक जण वृद्धांना टोचून बोलत आहे. मान देण्यापेक्षा अपमान करीत आहे. वृद्ध म्हणजे एक टाकाऊ वस्तू वाटत आहे. पूर्वी नैतिक मूल्यांचे जतन होते. आज नीतीमूल्ये पायदळी तुडविली जात आहेत. पाप–पुण्य, स्वर्ग–नर्क या गोष्टी विज्ञानवादापुढे सिद्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे वृद्धांचे कौटुंबिक प्रश्न निर्माण होतात. वृद्धांच्या समस्यांची तीव्रता केवळ नागरी क्षेत्रामध्ये उच्च विद्याविभूषित घरांमध्ये होती, परंतु आज ही तीव्रता ग्रामीण कुटुंबामध्ये ही जाणवते. जाती प्रथेमुळे व लोकनिंदेमुळे व्यक्ती आपल्या वृद्धांचे पालन–पोषण करीत होते, परंतु आज या संकल्पना निकामी होत असल्यामुळे वृद्धांच्या समस्येत वाढ होत आहे.

वृद्धांना उपाशी ठेवणे, शिळे अन्न खायला देणे, टोचून बोलणे, त्यांच्या गरजांकडे दुर्लक्ष करणे, प्रत्येक गोष्टींसाठी त्रास देणे, ही प्रवृत्ती प्रौढांमध्ये वाढत आहे. आपण देखील एक दिवस वृद्ध होणार आहोत याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. शासन देखील कठोर कार्यवाही, वृद्धांच्या समस्या सोडविण्यात कमी पडत आहे.

वृद्धांची म्हातारपणाची काठी (नातू/पणतू) मानला जातो. परंतू आज असे संस्कार कुटुंबात केले जात नाहीत. अन्यथा ही समस्या निर्माण होणार नाही. कुटुंबातील एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक ही भावना कमी होत आहे. वृद्ध राहतात त्या खोलीची, कपड्यांची स्वच्छतेकडे लक्ष दिले जात नाही. वृद्धांना औषध पाणी मागितले तर वेळेवर मिळत नाही. मात्र टिव्ही, मोबाइल आदींचे रिचार्ज तात्काळ केले जाते. कमवत्या वृद्धांपेक्षा पेन्शन नसलेल्या वृद्धांची कौटुंबिक स्थिती फारच निकृष्ट आहे. मुलांचे प्रदेश, वात्सल्य आणि आई–वडिलांची वाटणी ही तर भारतीय संस्कृतीला काळीमा फासणारी आहे.

निष्कर्ष :—

१. कुटुंबातील वृद्धांचे मानाचे स्थान कमी झाले आहे.
२. ग्रामीण कुटुंबामध्ये देखील वृद्धांचे प्रश्न तीव्र स्वरूप धारण करीत आहेत.
३. वृद्धांचे नातेवाईक केवळ वस्तू प्रमाणे त्यांच्याशी वर्तन करीत आहेत.
४. वृद्धांचा कुटुंबात भावनिक आणि मानसिक कोंडमारा होत आहे.
५. प्रत्येक गरजेसाठी वृद्धांना संघर्ष करावा लागतो.

शिफारशी :—

१. कुटुंबातील व्यक्तींनी वृद्धांशी आपलेपणांने वर्तन ठेवावे.
२. आपण देखील एक दिवस वृद्ध होणार आहोत याची जाणीव ठेवली पाहिजे.
३. मुलांवर योग्य ते संस्कार करावेत. (श्रावण बाळा प्रमाणे)
४. वृद्धाने आपल्या वाईट सवई सोडाव्यात.
५. शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनातील किमान १० टक्के वेतन वृद्ध माता—पित्यांच्या नावे सक्तीने जमा करावे.
६. वृद्धांच्या पेन्शन योजनेतील रक्कम वाढवावी.
७. संयुक्त कुटुंब पद्धतीचा स्वीकार करावा.

संदर्भ ग्रंथ :—

१. भारतीय सामाजिक समस्या — प्रा. गोरे ए. आर.
२. समकालीन भारतीय समस्या — प्रा. जयंत घाटगे
३. सामाजिक समस्या — सुमन पाटे
४. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या — डॉ. सुधा काळदाते
५. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या — रा. ल. लोटे

❑❑❑